


Title Code- MAHMAR-51647

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!




संपादक : जितेंद्र कायस्थ
Mob- 9822720784 Email- jansanchlan@gmail.com

वर्ष ३ रे | अंक : ७७२. वा | बुधवार | दि. १५ मे २०२४ | पृष्ठ ८ | किंमत ३रुपये

# आरोग्य विभाग भ्रष्टाचार प्रकरणी लोकायुक्तांची तत्परता गरजेची

## जिल्हा रुग्णालय भ्रष्टाचार प्रकरणी आरोग्य विभागाचा ढिसाळपणा कायम

## प्रत्येक चल अचल संपत्तीचे चित्रीकरण / फोटो पुराव्यानिशी तक्रारकर्त्यांकडे उपलब्ध

**जनसंचलन/बुलढाणा**

येथील जिल्हा रुग्णालयात बोकाळलेल्या भ्रष्टाचार प्रकरणी आरोग्य विभागाच्या अधिकाऱ्यांकडून तर भ्रष्टाचाऱ्यांना वाचवण्याचा आटापीटा होत असल्याचे एव्हाना स्पष्ट झाले आहे. त्यामुळे आता आरोग्य विभागाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांकडून कारवाई होईल कधी, यावर आज भलंमोठं प्रश्नचिन्ह उभं आहे. आपण सगळे भाऊ सर्व काही मिळून खाऊ... या स्थितीत आता या भ्रष्टाचार प्रकरणी यापूर्वीही लोकायुक्तांनी चौकशीचे आदेश दिले होते. मात्र, त्यानंतरही आरोग्य विभागाच्या काही बेशरम अधिकाऱ्यांनी ही चौकशी काहीही करून टाळण्याचा प्रयत्न केलेला आहे. त्यामुळे पुन्हा एकदा या प्रकरणी लोकायुक्तांनी थोडी तत्परता दाखवणे गरजेचे बनले आहे. येथील जिल्हा सामान्य रुग्णालयात गेल्या काही वर्षांमध्ये अधिकाऱ्यांकडून करण्यात आलेला करोडो रुपयांचा भ्रष्टाचार आणि त्यातून त्यांनी घेतलेल्या अवैध संपत्तीं / अपसंपदा बाबत सातत्याने तक्रारकर्ते सक्रियपणे विषय लावून धरत आहेत. त्यात दैनिक जनसंचलन व सिटी न्यूज आपली एक जबाबदारी म्हणून वृत्तमालिका प्रकाशित करून या भ्रष्टाचाराला चव्हाट्यावर आणण्याचे काम करीत आहे. एव्हढे सगळे होऊन देखील आरोग्य विभागातील काही नालायक आणि भ्रष्ट अधिकारी इतर अधिकाऱ्यांना वाचवण्याचे काम करीत आहेत. या भ्रष्टाचारासंदर्भात सामाजिक कार्यकर्ते तथा तक्रारकर्ते खरात यांनी थेट राज्याच्या लोकायुक्तांकडे

**पोस्टमार्टम ८४**

तक्रार दाखल केली होती. या तक्रारीवर लोकायुक्तांनी योग्य ती दखल घेऊन लगेच राज्याच्या आरोग्य आयुक्तांना यासंदर्भात योग्य ती चौकशी करून कारवाई करण्याचे निर्देश दिले होते. त्यानंतर शासकीय कामकाजानुसार आरोग्य विभागाच्या आयुक्तांनी या प्रकरणाची चौकशी करण्याचे निर्देश अकोला येथील आरोग्य उपसंचालकांना दिले होते. उपसंचालकांनी नंतर **यासंदर्भातील आदेश तत्कालीन जिल्हा शल्यचिकित्सक डॉक्टर नितीन तडस यांना दिले होते.खरे तर लोकायुक्तांकडे गेलेल्या या प्रकरणाची गांभीर्याने दखल घेऊन सर्व अधिकाऱ्यांनी आपले कर्तव्य चोख व प्रामाणिकपणे बजावण्याची आवश्यकता होती. मात्र, असे न होता केवळ कागदी घोडे बोथा मार्गे अकोला नाचवण्याचा खेळ सुरू होता.** जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. नितीन तडस यांनी या प्रकरणी अत्यंत निर्लज्जपणाची अर्थपूर्ण भूमिका घेऊन यासंदर्भातील अहवाल लवकर दिलाच नाही. दरम्यान, लोकायुक्तांकडून पत्र आलेले असल्यामुळे आरोग्य आयुक्त यांचे कार्यालय तथा आरोग्य उपसंचालक यांच्या कार्यालयाने याबाबत वारंवार पाठपुरावा केला.आरोग्य उपसंचालकांना बुलढाणा

**नियमबाह्य साहित्य व उपकरणे खरेदी प्रकरणात करोडो रुपयांचा भ्रष्टाचार व त्यातून जमा केलेली चल अचल संपत्ती/अपसंपदा फ्लॅट,बंगला,प्लॉट,सोन,आरामदायी चार चाकी, शेती खरेदी याची त्वरीत चौकशी करून ती शासन तिजोरीत जमा करा अन्यथा तक्रारकर्त्यांनी जिल्हाभर आंदोलन करण्याचा दिला इशारा**

जिल्हा शल्यचिकित्सकांना यासंदर्भात वारंवार सूचित केले. मात्र, जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. नितीन तडस हे इतके निर्लज्ज आणि नालायक निघाले की, त्यांनी आपल्याच वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या आदेशांना केराची टोपली दाखवली. अशाप्रकारची दिरंगाई करण्याचा प्रताप हा तडस यांनी केलाच कसा, हा मोठा प्रश्न आहे. तडस यांच्याकडे एव्हढा कोडगेपणा, निर्लज्जपणा आला कुठून, हाही एक प्रश्न आहे. **डॉक्टर तडस यांनी या माध्यमातून शराबी चित्रपटातील गीत आठवलं जहा चार यार मिलजाये रात वही गुजर जाये...** भ्रष्ट अधिकाऱ्यांना वाचवण्याचा प्रयत्न केल्याचे स्पष्टपणे दिसून येत आहे. त्यामुळे तडस यांच्यावर कठोर कारवाई होणे गरजेचे आहे. डॉ. नितीन तडस यांच्या या कृष्णकृत्यांची दखल आरोग्य विभागातील वरिष्ठ अधिकाऱ्यांनी घेणे गरजेचे होते. त्यांच्यावर कारवाई होणे आवश्यक होते. असे असले तरी आजवर त्यांच्यावर काय कारवाई झाली, याचे उत्तर आरोग्य विभागाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे नाही. मग आरोग्य विभागातील वरिष्ठ अधिकारी झोपा काढतात




की काय, अशी शंका उपस्थित होत आहे. एक प्रकारे तडस यांनी भ्रष्टाचाऱ्यांना गोलमाल करून वाचवण्याचा प्रयत्न करून स्वतःही या भ्रष्टाचारात आपण सामील असल्याचे दाखवून दिले आहे. ही एकंदर गंभीर स्थिती पाहता आता राज्याच्या लोकायुक्तांनी पुन्हा एकदा या भ्रष्टाचार प्रकरणी जो खेळखंडोबा चालला आहे आणि कागदी घोडे नाचवण्याचे काम चालले आहे, त्याबद्दल स्वतःहून दखल घेऊन आरोग्य विभागातील वरिष्ठ अधिकाऱ्यांना खडसावणे गरजेचे आहे. त्याशिवाय आरोग्य विभागाची ही सडलेली यंत्रणा चांगली होणार नाही. त्यामुळे आम्ही या माध्यमातून लोकायुक्तांना विनंती करतो की, त्यांनी तात्काळ दखल घेऊन संबंधितांवर कारवाईसाठी प्रयत्न सुरू आहेत. लोकायुक्तांच्या या कारवाईत दैनिक जनसंचलन व सिटी न्यूज सदैव त्यांच्या सोबत असेल, याची आम्ही ग्वाही देतो.

अजून बरेच काही पुढील भागात...

## इंस्टाग्रामवर आक्षेपार्ह पोस्ट करणाऱ्यावर गुन्हा दाखल

**जनसंचलन/ खामगाव**

इंस्टाग्रामवर आक्षेपार्ह पोस्ट करून इतरांच्या धार्मिक भावना दुखावणाऱ्या तसेच दोन समाजात तेढ निर्माण निर्माण करण्याचा प्रयत्न करणाऱ्या विरुद्ध तक्रारीवरून पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे. याबाबत तुषार सुरेश गुजर (१८) रा. चांदमारी याने शहर पोलीस स्टेशनला तक्रार दिली की, तो १३ मे रोजी मोबाईलमध्ये इंस्टाग्रामवर रिल्स पाहत असताना त्याला लकी नंदकिशोर वाकोडे रा. शंकर नगर याने केलेली पोस्ट आक्षेपार्ह दिसून आली.




यामुळे इतर लोकांच्या धार्मिक भावना दुखावल्या गेल्या असून त्याचे हे कृत्य दोन धर्मात तेढ निर्माण करणारे आहे. अशा तक्रारी वरून शहर पोलिसांनी लकी नंदकिशोर वाकोडे याच्या विरुद्ध कलम १५३अ, ५०५ (२), २९८ भादंवीनुसार गुन्हा दाखल केला आहे. पोलीस पुढील तपास करीत आहेत.

## ढोरवी येथील अवैद्य रेतीचे टिपर पकडले

**जनसंचलन/ सिंदखेडराजा**

१४ मे रोजी सिंदखेडराजा तालुक्यात अवैध रेती वाहतूक व उत्खनन प्रतिबंध्द करण्यासाठी मा.उपविभागीय अधिकारी सिंदखेडराजा व तहसिलदार सिंदखेडराजा यांचे मार्गदर्शनाखाली अवैध गौणखनिज प्रतिबंध पथक गस्त करीत असता मलकापुरपांग्रा ढोरव्ही रस्त्यावर टिपर वाहन क्रमांक २८ ७५७७ मध्ये ३ ब्रास अवैधरेती वाहतुक अढळुन आले. वाहन मालक रविंद्र बापुराव मुरकुट रा.ढोरव्ही ता.सिंदखेडराजा यांचेकडे रेती वाहतुक



परवाना अढळुन आला नाही.त्यामुळे सदर वाहन पोलीस स्टेशन साखरखेर्डा येथे जमा करण्यात आले आहे. सदर कारवाई मध्ये तलाठी जी.वाय.दराडे, आर.बी.काकडे, एस एस चव्हाण, ए.ओ. गव्हाणकर कोतवाल आकाश माघाडे, रामेश्वर यांनी मिळुन केली.

दैनिक जनसंचलन
निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# टंचाईग्रस्त गावातील जलनमुने घेण्याचे जिल्हाधिकारी यांचे निर्देश

जनसंचलन/बुलढाणा

जिल्ह्यात उद्भवलेल्या पाणीटंचाईच्या पार्श्वभूमीवर टँकर आणि अधिग्रहित खासगी विहिरीद्वारे पाणीपुरवठा करण्यात येणाऱ्या जिल्ह्यातील २२५ गावांतील पाणी नमुने घेण्याचे निर्देश पंचायत समित्यांना देण्यात आले आहे. जिल्ह्यात जलजन्य आजारांचा प्रादुर्भाव रोखण्याच्या दृष्टीने उपाययोजना करण्यात येत आहे. नुकतीच जिल्हाधिकारी किरण पाटील यांनी संभाव्य साथरोग प्रादुर्भाव रोखण्यासाठी आरोग्य विभागाची बैठक घेतली होती. त्यामध्ये त्यांनी विविध उपाययोजना सुचविल्या होत्या. सोबतच टँकर व विहिरीद्वारे पाणीपुरवठा करण्यात येणाऱ्या गावातील पाणी नमुने घेण्याचे निर्देशही दिले होते. त्या अनुषंगाने आता जिल्हा परिषदेचा आरोग्य सतर्क झाला आहे. विभागाने सर्व पंचायत समित्यांच्या बीडीओना तसे लेखी आदेश दिले. टँकर व नेहमीपेक्षा वेगळ्या विहिरीद्वारे पाणी पुरवठा होत असलेल्या गावांतील पाणी नमुने घेण्याचे त्यात स्पष्ट करण्यात आले.१ लाख ६० हजार ग्रामस्थांची टँकरवर मदार जिल्ह्यात पाणीटंचाईची दाहकता वाढली आहे. ७ तालुक्यांतील ५४ गावांना ५५ टँकर द्वारे पाणीपुरवठा होत आहे. इतर जलस्रोत अपुरे पडत असल्याने १ लाख ५८ हजार ५३४ ग्रामस्थांना तहान भागविण्यासाठी टँकर व अधिग्रहीत विहिरींचाच पर्याय उरला आहे. देऊळगाव राजात ११ गावांना, चिखलीत १२, बुलढाण्यात १३, मेहकरमध्ये ९, सिंदखेड राजात ३, लोणारमध्ये २, तर मोताळ्यात ४ गावांना ५ टँकरद्वारे पाणीपुरवठा होत आहे. खासगी विहिरीद्वारे होणाऱ्या पाणीपुरवठ्यावर अवलंबून राहावे लागत असल्याने ग्रामीण भागात पाण्यासाठी ग्रामस्थांचे हाल होत आहे. ८ तालुक्यांतील १७१ गावांसाठी २०३ खासगी विहिरी अधिग्रहित करण्यात आल्या आहे. यामुळे ग्रामस्थांच्या आरोग्यासाठी पाण्याचे नमुने तपासणी गरजेचे आहे. साथरोगांचा उद्रेक टाळण्याच्या दृष्टीनेही पाणी तपासणी गरजेचीच आहे.

# कृषी विज्ञान केंद्रात शुक्रवारी आंबा महोत्सव

## नागरिकांनी लाभ घेण्याचे आवाहन...




जनसंचलन/बुलडाणा

बुलडाणा येथील कृषी विज्ञान केंद्राच्या वतीने शुक्रवारी, दि. १७ मे रोजी एक दिवसीय आंबा महोत्सव आयोजित केला आहे. या महोत्सवात आंबा प्रदर्शनी आणि विक्री करण्यात येणार आहे. नागरिकांनी या महोत्सवाचा लाभ घ्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे. कृषी विज्ञान केंद्र नाविन्यपूर्ण कृषी तंत्रज्ञानाचा विस्तार करण्याचे कार्य विविध माध्यमातून करीत आहे. जिल्ह्यातील आंबा उत्पादक शेतकऱ्यांना आंबा उत्पादनासाठी वाव मिळावा आणि आंबा प्रेमींना विविध जातींच्या आंब्याची चव चाखता यावी, यासाठी अजिंठा रस्त्यावरील कृषि विज्ञान केंद्रामध्ये कृषि विज्ञान केंद्र, कृषि विभाग आणि आत्माच्या वतीने सकाळी ९ वाजता आंबा महोत्सव, प्रदर्शनी व विक्रीचे आयोजन करण्यात आले आहे. जिल्ह्यातील आंबा उत्पादक शेतकऱ्यांना त्यांच्याकडील आंबा सदर महोत्सवात विनाशुल्क विक्रीसाठी ठेवता येईल. आंबा महोत्सवाचे उद्घाटन जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांच्या हस्ते होणार आहे. डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. शरद गडाख अध्यक्षस्थानी राहतील. प्रमुख पाहुणे म्हणून विस्तार शिक्षण संचालक डॉ. धनराज उंदिरवाडे, संशोधन संचालक डॉ. विलास खर्चे, कृषी अधिष्ठाता श्यामसुंदर माने, उद्यानविद्या अधिष्ठाता डॉ. देवानंद पंचभाई, कृषी अभियांत्रिकी अधिष्ठाता डॉ. सुरेंद्र काळपांडे उपस्थित राहणार आहेत. तसेच मुख्य कार्यकारी अधिकारी बाळासाहेब मोहन, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी मनोजकुमार ढगे, आत्माचे प्रकल्प संचालक पुरुषोत्तम उन्हाळे, कृषी संशोधन केंद्राचे प्रमुख डॉ. दिनेश कानवडे, कृषी तंत्र विद्यालयाचे प्राचार्य डॉ. सतीशचंद्र जाधव, माविमचे जिल्हा समन्वय अधिकारी सुमेध तायडे उपस्थित राहणार आहेत. महोत्सवात स्थानिक आंबा जातींची ओळख, आंबा फळाच्या विविध वाणांची प्रदर्शनी व विक्री, आंबा लागवड व व्यवस्थापनासाठी तज्ज्ञांचे मार्गदर्शन आणि आंब्याच्या वाणांची कलम विक्री, तसेच आंब्यापासून बनविलेले विविध प्रक्रिया पदार्थ विक्रीसाठी उपलब्ध राहणार आहेत. महोत्सवात शेतकरी आणि नागरिकांनी सहभाग नोंदवावा, असे आवाहन कृषी विज्ञान केंद्राचे वरिष्ठ शास्त्रज्ञ तथा प्रमुख डॉ. अनिल तारू यांनी केले आहे.

# कापसाला अपेक्षित दर नाही कापसाच्या थप्पीने झोप उडवली

जनसंचलन/बुलडाणा

जिल्ह्यात मोठ्या प्रमाणाव कापूस उत्पादन घेतले जाते. मात्र नैसर्गिक संकटांनी उत्पादनात मोठ घट झाली. जिल्ह्यात सुमारे दोन लाख हेक्टरवर कपाशीची लागवड होव असते. दरम्यान, भाव वाढतील या आशेन वेचलेला कापूस शेतकऱ्यांनी घरातच ठेवला. मात्र, आता पुढील खरीप हंगाम आला तरी कापसाच्या दरात सुधारणा होत नसल्याने शेतकरी हवालदिल झाले आहे. दोन वर्षांपासून कापसाच भाव वाढण्याऐवजी कमी होत असल्याने शेती करावी तर कशी, असा सवाल उपस्थित होत होत आहे एकीकडे वाढती महागाई आणि दुसरीकडे घटते शेतमालाचे दन शेतकऱ्यांची चिंता वाढवीत असून याकडे लक्ष देण्याची मागणी शेतकऱ्यांमधून होत आहे. दरम्यान



बियाणे, खते खरेदीचे आर्थिक चणचण भासत असल्याने शेतकरी चिंतेत आहे

# विहिरीवर पोहायला गेलेल्या तरुणाचा पाण्यात बुडून मृत्यू


जनसंचलन/ खामगाव

मित्रांसोबत पोहायला गेलेल्या तरुणाचा विहिरीच्या पाण्यात बुडून मृत्यू झाल्याची घटना तालुक्यातील वझर शिवारात घडली. वझर येथील विकास शंकर वाकोडे (२३) हा सोमवार १३ मे रोजी गावातील काही मित्रांसोबत शासकीय पाण्याच्या विहिरीत पोहायला गेला होता. दरम्यान पोहतांना त्याचा पाण्यात बुडून मृत्यू झाला. ही घटना उघडकीस आल्या नंतर गावकऱ्यांची या ठिकाणी गर्दी झाली होती. या घटनेने गावात हळहळ व्यक्त होत आहे. या प्रकरणी हिवरखेड पोलिसांनी मृतक विकास वाकोडे आकस्मिक मृत्यूची नोंद केली असून पुढील तपास सुरू आहे.

# दीड महिना आता लग्नमुहूर्त नाही त्यामुळे व्यवसायाचा वाजला बॅण्ड!

जनसंचलन/बुलढाणा

मार्च एप्रिल महिन्यात मोठ्या प्रमाणात लग्नसोहळे उरकले गेले. मे आणि जून महिन्यांच्या विवाह मुहूर्त नसल्याने अनेकांनी एप्रिलमध्येच लग्नाचा बार उडवून टाकला. आता २५ जूनपर्यंत विवाह मुहूर्त नसल्यामुळे नुकतेच लग्न जुळलेल्या वधू-वरांना मुहूर्तासाठी प्रतीक्षा करावी लागणार आहे. दरम्यान, यंदा मुहूर्त अत्यंत कमी असल्याने यावर अवलंबून असलेल्या व्यावसायिकांना मात्र अडचणीचा सामना करावा लागत आहे. यंदा मे आणि जून महिन्यांत लग्नकार्यासाठी मुहूर्त नाहीत. त्यामुळे बॅण्डवाल्यांपासून ते मंडप डेकोरेशन, मंगल कार्यालय, लॉन, आचारी, केटरर्स, प्रोहित, फोटोग्राफर, टेलरिंग व्यावसायिक आदी लग्नकार्यावर अवलंबून असलेल्या व्यावसायिकांना एकप्रकारे आर्थिक फटका बसणार आहे. मे आणि जून महिन्यांत लग्नतारखांअभावी व्यावसायिकांची चांगलीच पंचाईत होत आहे. यावर्षी विवाहाचे योग गतवर्षीपेक्षा कमी आहेत. दरवर्षी मे आणि जून महिन्यांत विवाह सोहळे मोठ्या प्रमाणात पार पडायचे. यंदा मात्र मे जूनमध्ये गुरू आणि शुक्र या दोन्ही ग्रहांचा एकत्रित अस्त असल्याने या काळात मंगलकार्य करू नये, असे शास्त्र सांगते. दोघांचा एकत्रित अस्त असल्याने मे महिन्यात १ आणि २ रोजी मुहूर्त होते. आता २५ गतवर्षी एप्रिल महिन्यात मे, जूनमध्ये गुरुचा अस्त गतवर्षी मे महिन्यात १४, तर जून महिन्यात जवळपास ११ विवाह मुहूर्त होते. यंदा मे महिन्यातील १ आणि २ तारखा सोडल्या तर मुहूर्त नव्हते. जूननंतर मुहूर्त आहेत. अशी परिस्थिती तब्बल २३ वर्षांनंतर पहिल्यांदा आली आहे. गतवर्षी एप्रिल महिन्यात गुरूचा असल्याने विवाह सोहळे होऊ शकले नाही. यंदा मात्र मोठ्या प्रमाणात एप्रिल महिन्यात विवाह मुहूर्त आहे. मात्र, मे



महिन्यात दोन विवाह मुहूर्त सोडले तर एकही मुहूर्त नव्हता. जून महिन्यात यंदा गुरूचा अस्त असल्याने मुहूर्त नाही. परिणामी विवाह सोहळ्याशी संबंधित व्यावसायिकांना जूनअखेरपर्यंत वाट पाहावी लागणार आहे.

*The Daily News Paper Jansanchalan printed by owner, publisher and editor Jitendra Devchand Kayastha at Sarvadnya Printers Buldhana and published at Dainik Jansanchalan Office Shivshopping Complex Buldhana. Dainik Janasanchalan printers, owners and editors do not necessarily agree with the opinions published in the issue* Court. 9822720784 Title Code-MAHMAR-51647 Email- jansanchlan@gmail.com

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# लोणार तहसीलदार अजय पिंपरकर यांचे अवैध रेती वाहनावर धडाकेबाज कारवाई

## अवैध रेती वाहतूक वाहनाला २ लाख ६६ हजार ठोठावला दंड

जनसंचलन/ लोणार

मराठवाड्यातून विदर्भात येणाऱ्या रात्रीच्या वेळी अवैध रेती वाहतूक करणाऱ्या वाहनाला लोणार तहसीलचे प्रभारी तहसीलदार अजय पिंपरकर यांच्या पथकाने पकडून दोन्ही वाहनाला २ लाख ६६ हजार रुपयांचा दंड ठोठावला.

याबाबत सविस्तर वृत्त असे की मराठवाड्यातून रात्रीच्या वेळी अवैध रेती वाहतूक होत असल्याची माहिती लोणार मंडळ अधिकारी लक्ष्मणराव सानप यांना मिळाली त्यांनी तात्काळ ही बाब पथकप्रमुख तथा लोणार तहसीलचे प्रभारी तहसीलदार अजय पिंपरकर यांना सांगितली कुठलीही वेळ न गमावता प्रभारी तहसीलदार अजय पिंपरकर यांनी आपल्या पथकासह शेगाव पंढरपूर राष्ट्रीय महामार्गावरील गणपती मंदिरासमोर अवैध रेती वाहतूक करणारे वाहन क्र. एम.एच.३७टी ३४२८ व एम.एच.२१ बीएच४०५१



अवैध रेती वाहतूक करतांना आढळले. त्या वाहनांना ताब्यात घेत त्यांना अनुक्रमे १ ब्रास ,व २ ब्रास असा एकूण २ लाख ६६ हजार रु.दंड ठोठावला या कारवाईत लोणार तहसीलचे प्रभारी तहसीलदार अजय पिंपरकर,मेहकर तहसीलदार भूषण पाटील,लोणार मंडळ अधिकारी लक्ष्मणराव सानप,मेहकर मंडळ अधिकारी पंजाबराव मेटांगळे,महसूल अधिकारी पुरुषोत्तम आघाव यांनी सहभाग घेतला असून या अवैद्य रेती वाहनावर झालेल्या कारवाईमुळे अवैध रेती वाहतूक करणाऱ्या रेती माफियांचे धाबे दणाणले असून या पुढे अवैद्य रेती वाहतूक करणाऱ्यावर कडक कारवाई करण्याचा इशारा लोणार तहसीलचे प्रभारी तहसीलदार अजय पिंपरकर व मंडळ अधिकारी लक्ष्मणराव सानप यांनी दिला आहे.

# लाखनवाडा येथे वाहकाला केली मारहाण

## एसटी कर्मचारी संघटनेमध्ये तीव्र नाराजी

जनसंचलन/ खामगाव

तालुक्यातील लाखनवाडा बु. येथे मुक्कामासाठी असलेल्या बसच्या वाहकाला १४ मे रोजी सकाळी गावातील एका व्यक्तीने मारहाण - केल्याची घटना घडली. यामध्ये ते - गंभीर जखमी झाले. एसटी कर्मचारी संघटनांमध्ये या घटनेच्या विरोधात रोष - निर्माण झाला आहे. चालक-वाहकांना - मारण्याच्या घटनांमध्ये वाढ होत - असल्याने यासंदर्भात प्रशासनाने ठोस - भूमिका घेऊन अशा घटना थांबविण्यासाठी प्रयत्न करण्याची मागणी केली आहे. एसटी महामंडळाचे वाहक मोहम्मद - रियाज मोहम्मद अयाज (५०) व चालक - सुमित इंगळे हे बस क्रमांक एमएच ४० एन ८२९० घेऊन लाखनवाडा बु. येथे रात्री मुक्कामी गेले होते. सकाळी वाहक मो. रियाज यांना गावातील दादराव नाना मारकंड याने लोखंडी पाइपने मारहाण केली. यामध्ये ते गंभीर जखमी झाले. त्यांना तातडीने खामगाव सामान्य रुग्णालयात दाखल करण्यात आले. यासंदर्भामध्ये



त्यांनी हिवरखेड पोलिस ठाण्यात तक्रार दिली. या तक्रारीमध्ये पोलिसांनी आरोपीविरोधात भादंवि कलम ३२४, ५०४, ५०६ नुसार गुन्हा दाखल केला आहे. या घटनेची माहिती खामगाव एसटी आगारात पसरताच एसटी चालक-वाहक कर्मचारी सर्व संघटना एकत्र आल्या. त्यांनी या घटनेसंदर्भात तीव्र नाराजी व्यक्त करीत या घटनेबाबत आगारप्रमुख यांच्यासोबत चर्चा केली. तसेच या घटनेनंतर वरिष्ठ अधिकाऱ्यांनी लाखनवाडा येथे मुक्कामासाठी कर्मचाऱ्यांसाठी कायमस्वरूपी चांगली व्यवस्था करावी. सुरक्षा मिळावी तसेच लाखनवाडा येथे मुक्कामी बस पाठवू नये, यासंदर्भात संघटनेचे अध्यक्ष शिवाजी आनंदे व इतर संघटनांच्या प्रमुखांनी आगारप्रमुखांसोबत चर्चा केली. दररोज लाखनवाडा येथे तीन बस रात्री मुक्कामी जात असल्याने येथे जाणाऱ्या चालक, वाहक कर्मचाऱ्यांच्या सुरक्षेसंदर्भात निर्णय घ्यावा, अशी ही मागणी केली.

# महिलेचा पाठलाग करुन केला तिचा विनयभंग

जनसंचलन/ खामगाव



मुलाला शोधण्याकरीता रस्त्याने जात असलेल्या महिलेचा पाठलाग करुन एका इसमाने तिचा विनयभंग केल्याची घटना तालुक्यातील बरफगाव येथे घडली. येथील ५० वर्षीय महिला ११ मे रोजी सायंकाळी मुलाला शोधण्याकरीता जात असतांना गावातीलच भागवत शालीग्राम झांबरे याने तिचा पाठलाग करून गैरवर्तन करत विनयभंग केला. याप्रकरणी सदर महिलेच्या तक्रारीवरुन पि. राजा पोलिसांनी भागवत झांबरे याच्याविरुध्द गुन्हा दाखल केला आहे.

# रावेर लोकसभा अंतिम ६४. २८ टक्के मतदान

जनसंचलन/ जळगाव




१४ लोकसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ करीता रावेर लोकसभा मतदार संघात सोमवार १३ मे रोजी मतदान प्रक्रिया पार पडली. रावेर लोकसभा मतदार संघात ६४.२८ टक्के मतदान झाले. रात्री आकडेवारी उपलब्ध न झाल्यामुळे पूर्ण टक्केवारी प्रशासनातर्फे मंगळवारी जाहीर करण्यात आली. सोमवार १३ मे रोजी सकाळी ७ वाजेपासून मतदान प्रक्रियेला दोन्ही मतदार संघात सुरुवात झाली. सायंकाळी सहा वाजेपर्यंत मतदान प्रक्रिया सुरु होती. सकाळी ऊन होण्याच्या आधी मतदान करण्यासाठी महिला मतदान केंद्रावर मतदारांनी रांगा लावल्या होत्या. जळगाव येथील जिल्हाधिकारी कार्यालयाच्या परिसरात असलेल्या अल्पबचत भवन येथे मतदान केंद्रावरची हालचाल टिपण्यासाठी वेबकास्टिंग कक्ष स्थापन करण्यात आला होता. स्वतः जिल्हाधिकारी दिवसभर प्रत्येक मतदान केंद्रावर लक्ष ठेऊन असल्यामुळे मतदान शांततेत पार पडले.जिल्ह्यात सोमवारी सकाळी ११ ते दुपारी १ या कालावधीत सर्वाधिक मतदान झाले. जिल्ह्यातील अनेक मतदान केंद्रावर सकाळच्या वेळेत गर्दी झाल्याचे दिसून आले. दुपारी उन्हाची वेळ झाल्यानंतर ओसरली. मात्र गर्दी मतदानाची टक्केवारी रावेर लोकसभा मतदार संघात ०६ लक्ष २१ हजार पुरुष मतदारांनी मतदानाचा हक्क बजावला तर ०५ लक्ष ४८ हजार ९५० मतदारांनी सोमवारी आपला मतदानाचा हक्क बजाविला, तर ११ तृतीय पंथीयांनी मतदानाचा हक्क वाजविला. एकूण ६६.०५टक्के पुरुष, ६२.३८ टक्के महिला व २०.३७ टक्के तृतीयपंथी मतदारांनी मतदानाचा हक्क बजावला असे एकुण ६४. २८टक्के मतदान झाले.या वर लक्ष ठेऊन होते.

# जिल्हाधिकारी कार्यालयात राजे छत्रपती संभाजी महाराज यांची जयंती साजरी

जनसंचलन/बुलढाणा

जिल्हाधिकारी कार्यालयात आज राजे छत्रपती संभाजी महाराज जयंती साजरी करण्यात आली. राजे छत्रपती संभाजी महाराज जयंतीनिमित्त तहसीलदार माया माने यांनी पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. यावेळी तहसिलदार संजीवनी मुपळे, नायब तहसीलदार प्रमोद करे, विधी अधिकारी गजानन



पदमने, नाझर गजानन मोतेकर, सुरेश खोडके, नंदकुमार येसकर यांच्यासह कर्मचारी उपस्थित होते. उपस्थितांनी राजे छत्रपती संभाजी महाराज यांना अभिवादन केले.

दैनिक जनसंचलन निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# छत्रपती संभाजी महाराजांच्या जयघोषात आसमंत दुमदुमली बुलढाणा नगरी

## शोभायात्रा ठरली आकर्षण: देखावे, चित्तथरारक प्रात्यक्षिकांनी नागरिकांना ठेवले खिळवून





बुलढाणा शहरातील धर्मवीर छत्रपती श्री संभाजी महाराज स्मारक स्थळी सकाळी पुजाताई गायकवाड व अन्य महिलांच्या उपस्थितीत जन्मोत्सव साजरा करून पाळणा सादर करण्यात आला. सकाळी साडेआठ वाजता हा कार्यक्रम झाला.

**जनसंचलन/बुलढाणा**

स्वराज्य रक्षक छत्रपती संभाजी महाराजांच्या जयंतीनिमित्त १४ मे रोजी बुलढाण्यात शोभायात्रा काढण्यात आली. रस्त्या रस्त्यावर लावलेले भगवे ध्वज, घोडेस्वारांचे जिवंत देखावे, चौकाचौकात झालेले शिवकालीन खेळ उपस्थितांमध्ये रोमांच उभे करून गेले. आंध्रप्रदेशातील कावड आणि दिल्लीतील महाकाली पथक या शोभायात्रेचे आकर्षण ठरले होते. धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त आ. संजय गायकवाड यांच्या नेतृत्वात धर्मवीर आखाड्याच्यावतीने आयोजित छत्रपती संभाजी महाराज जयंती उत्सवाचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये १३ मे रोजी सकाळी शहरातून मोटार सायकल रॅली काढण्यात आली होती. १४ मे रोजी सायंकाळी संगम चौकातून शोभायात्रेस प्रारंभ झाला. वाहनांवर सजविलेले देखावे, घोड्यांवर स्वार मावळे, त्यातच प्रभु श्रीराम, हनुमान, शिवराय, जिजाऊ, शंभुराजे यांच्यासह अन्य महापुरुषांचे आकर्षक पुतळे शोभायात्रेची भव्यवता दर्शनिन होते





या मिरवणुकीत मल्ल खांबाचे मुले आणि मुलींनी सादर केलेल्या कसरती, आंध्रप्रदेशातील कावड पथक, शिवकालीन युद्ध कलेची दाखविण्यात आलेली प्रात्याक्षीक उपस्थितांना खिळवून ठेवत होते. मिरणुकीमध्ये मोठ्या संख्येने नागरिक सहभागी झाले होते.

सायंकाळी आ. संजय गायकवाड यांच्या नेतृत्वात जयंती उत्सव समितीचे अध्यक्ष बाळासाहेब धुड, कार्याध्यक्ष आशिष जाधव, मोहन पहाड, संदीप गायकवाड, जीवन उबरहंडे, श्रीकांत गायकवाड यांच्यासह अन्य मान्यवरांच्या उपस्थितीत पुजन होऊन आरत करण्यात आली.

---

## दारुसाठी पैसे मागितल्या वरून वाद वादाचे रूपातंर हाणामारीत

**जनसंचलन/ संग्रामपूर**

दारू पिण्यास पैसे मागितले असताना दिले नाही. व घरासमोर दोघात वाद सुरू असताना तिसऱ्याने हस्तक्षेप केला. अशा पर-स्पर विरोधी तक्रारी दाखल झाल्याने पाच जणांविरुद्ध गुन्हा दाखल झाल्याची घटना ग्राम बोडखा येथे सोमवारी घडली. पोलीस सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार अमोल ठाकरे यांनी पोलिसात फिर्याद दिली की ते त्यांचे घराजवळ उभे असताना चार ते पाच जण आले दारू पिण्यासाठी त्यांनी पैशाची मागणी केली असता त्यांनी पैसे देण्यास नकार दिला. यावेळी त्यांनी अमोल ठाकरे यांना शिवीगाळ करून लोखंडी रॉडने मारहाण केली. त्यांची पत्नी आवरण्यास आली असता यातील चौघांनी त्यांचे गळ्यातील सोन्याचा हार अंदाजे किंमत ३० हजार रुपये घेऊन ते पळून गेले. ही माहिती कोणाला देऊ नको अशी धमकी दिली. अशा फिर्याद वरून आर-ोपी श्रीकृष्ण दामोदर भवर बाळकृष्ण दामोदर भवर परस्पर विरोधात तक्रारी ५ जणांविरुध्द गुन्हा विनोद आत्माराम पोफळणारे प्रवीण आत्माराम पोपळ-णारे सर्व रा. बोडखा यांचे विरुद्ध कलम ३९२,३२४,३२३ ,२९४,५०६ ३४ भादंवि नुसार दाखल करण्यात आला. तर श्रीकृष्ण दामोदर भवर यांनी पोलिसात फिर्यादि दिली की त्यांचा आते भाऊ विनोद पोफळणारे व अमोल ठाकरे



यांचे त रस्त्यावर वाद सुरू असताना ते वाद मिटवण्यास गेले असता तू कशाला आमचे मधात आला असे म्हणत लोखंडी पाईपने मारहाण करून जीवे मारण्याची धमकी दिली.यावरून अमोल ठाकरे रा . बोडखा याचे विरुद्ध कलम ३२४ ,२९४, ५०४,५०६ भादवी दाखल करण्यात आला. वृत्त लिही पर्यंत यात एकाही आरोपीला अटक झाली नसल्याचे पोलिसांकडून सांगण्यात आले.

## राजूरच्या विशाल धाब्यावरून ३ बालकामगारांची सुटका

**जनसंचलन/बुलढाणा**

राजुर घाटाच्या पायथ्याशी असलेल्या विशाल वाईन बारवर काम करणाऱ्या तीन बालकामगारांची मंगळवार १४ मे रोजी सुटका करण्यात आली. चाईल्ड हेल्पलाइनला आलेला तक्रारीनंतर जिल्हा बालकल्याण पोलीस स्टेशन बोराखेडी समिती आणि सरकारी कामगार जि. बुलडाणा अधिकारी कार्यालयाने संयुक्तपणे धाड टाकली असता अठरा वर्षांपेक्षा कमी वयाचे असलेले तीन बालकामगार या ठिकाणी आढळून आले. दरम्यान विशाल धाब्याच्या मालकाविरोधात बालकामगार कायद्याच्या विविध कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला. राजुर घाटाच्या पायथ्याशी असलेल्या विशाल धाब्याच्या मालकाचे नाव दिनेश इंगोले असून त्यांच्या विरोधात बोराखेडी पो-लीस स्टेशनमध्ये गुन्हा दाखल करण्यात आल्याची माहिती आहे. ज्या बालकामकारांची सुटका केली. त्यांना आता जिल्हा बालकल्याण समितीसमोर उपस्थित केले जाण-ार आहे. जिल्हा सरकारी कामगार अधिकारी कार्यालयाचे प्रमुख तसेच इतर सहकाऱ्यांसमवेत जिल्हा बाल कल्याण समितीचे प्रमुख दिव-ेश मराठे, चाईल्ड हेल्पलाईनचे शेख, साहेब, बालसंरक्षण अधिकारी सागर राऊत आणि सुपरवायझर सागर नरवाडे यांनी सदर कारवाई यशस्वी करण्यासाठी परिश्रम घेतले.